# <u>जाहिर लिलाव</u>

## सातारा जिल्हा परिषद,
## कार्यकारी अभियंता,
## बांधकाम विभाग (उत्तर), जि. प. सातारा
## यांत्रिकी उपविभाग.

तमाम लोकांना कळविण्यात येते की, जाहिर लिलावाव्दारे दि. १४/०२/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता यांत्रिकी उपविभाग व बांधकाम विभाग(उत्तर) जि. प. सातारा या कार्यालयांमार्फत जि. प. सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये जिल्हा परिषदेकडील निरुपयोगी व विनावापर पडून असलेली वाहने एकूण १४ (ॲम्बेसॅडर कार, महिंद्रा जीप, टाटा सफारी, वॉटर टँकर इ.) व निरुपयोगी टायर्सचा **'जेथे आहे त्या स्थितीमध्ये'** लिलाव करण्यात येणार आहे.

**ॲम्बेसॅडर कार- ८, महिंद्रा जीप- ३, टाटा सफारी- १, वॉटर टँकर- २, निरुपयोगी टायर्स- १०० नग.**

**टिप-**

१. जाहिर लिलाव परतावा प्रवेश फी र. रु. ५०००/- प्रति व्यक्ती रोख/ धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. सातारा यांचे नावे काढावा. त्याशिवाय लिलावात भाग घेणेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

२. कोणत्याही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता लिलाव प्रक्रिया स्थगित करण्याचा संपूर्ण अधिकार लिलाव समितीस राहील.

३. वाहने/ यंत्रसामुग्री सातारा जिल्हा परिषद सातारा, आवारात पहावयास उपलब्ध आहेत. याबाबतची अधिक माहिती उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जि. प. सातारा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे.

**स्वाक्षरीत/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

# <u>जाहीर लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती</u>

१) साहित्याची पहाणी वेळ **दिनांक ०६/०२/२०१८ ते १३/०२/२०१८ सकाळी १०.३० ते ५.४५** व लिलावाचे दिवशी दि. १४/०२/२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यंत.

२) लिलावात बोली बोलणेपुर्वी **रू. ५०००/- ही अनामत रक्कम** उप अभियंता (यां) जिल्हा परिषद सातारा यांचेकडे जमा करावी. त्याशिवाय बोलीत भाग घेता येणार नाही. फक्त अनामत रक्कम भरणाऱ्या व्यक्तीस लिलाव हॉल मध्ये प्रवेश देण्यात येईल.

३) बोलीदाराने बोली बोलणेपूर्वी साहित्याची पूर्ण तपासणी केली आहे. असे गृहीत धरण्यात येऊनच साहित्याची विक्री केली जाईल. या नंतर साहित्याबाबतची कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

४) सर्व साहित्य **"आहे त्या ठिकाणी आहे त्या स्थितीत"** जाहीर लिलावाने विकणेत येणार आहे.

५) लिलावाचे ठिकाणी बोलीदाराला मंजूर बोलीच्या **२५ टक्के इसारा रक्कम रोखीने त्वरीत भरावी लागेल.** लिलावाची पूर्ण रक्कम भरेपर्यंत लिलावाच्या साहित्याची संपूर्ण जबाबदारी बोलीदाराची राहील त्यास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही. रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. विक्री रद्द करुन सदर साहित्याचा फेर लिलाव करणेत येईल.

६) लिलाव मंजुर झाल्यानंतर बोलीदाराने १० दिवसाचे आत त्याने उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम ठरवून दिलेल्या १० दिवसाच्या मुदतीत न भरल्यास १३ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. (व्याज प्रतीदिन परीगणीत केले जाईल.) ही मुदत देखील १५ दिवसाची राहिल. तदनंतर ही उर्वरीत रक्कम न भरल्यास अमानत रक्कम व इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल व विक्री रद्द करणेत येईल. **उर्वरीत ७५ टक्के रक्कमेचा भरणा उपअभियंता यांत्रिकी याचे कार्यालयात करणेचा आहे.**

७) बोलीदाराने पूर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर संबंधीत साहित्य जिल्हा परिषदेच्या कार्यशाळेतून १५ दिवसांच्या आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. तदनंतर **प्रती दिन रु. १००/- (रु. शंभर फक्त) दंड आकारण्यात येईल.** ९० दिवसाच्या आत साहित्य ताब्यात न घेतल्यास लिलाव समितीला लिलाव रद्द करणेचा अधिकार राहिल व संबंधीत खरेदीदाराची अनामत रक्कम व ९० दिवसाची दंडाची रक्कम वसूल करुन उर्वरीत रक्कम देण्यात येईल.

८) लिलाव खरेदी दाराने माल ताब्यात घेताना इतर मालमत्तेचे नुकसान झालेस लिलाव खरेदीदाराला झालेल्या नुकसानी बद्दल जबाबदार धरण्यात येईल.

९) यशस्वी बोलीदाराने विकत घेतलेल्या साहित्याचे **खरेदीच्या रक्कमेवर विक्रीकर, वस्तु व सेवा कर व इतर सर्व प्रकारचे कर शुल्क भरणे आवश्यक आहे**. शासनाने वस्तु व सेवा कर/आयकर व इतर करांमध्ये बदल केल्यास लिलाव खरेदीदारास भरणे बंधनकारक राहिल. कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीदारास मिळणार नाही. सर्व कर भरलेचे चलन दाखविल्या शिवाय वाहन ताब्यात दिले जाणार नाही.

१०) वस्तु व सेवा करासंदर्भात संबंधीत कार्यालयामार्फत स्पष्ट निर्देश नसलेने वस्तु व सेवा कराच्या दराबाबत संबंधीत बोलीदाराने १०० रु. च्या स्टॅम्प पेपर बंधपत्र लिहून देणे आवश्यक आहे.

११) वाहनाची डिलिव्हरी (ताबा) दिलेनंतर त्या **वाहनाचा रोड टॅक्स, पर्यावरण कर, इन्शूरन्स व ट्रान्सफर खर्च, डूपलिकेट आर. सी /टि सी इत्यादी बाबतचा खर्च यशस्वी बोलीदाराने करावयाचा आहे**.

१२) वाहनांची डिलिव्हरी (ताबा) वाहनाचा वस्तु व सेवा कर/ आयकर भरलेचे चलन दाखविले नंतर देण्यात येईल.

१३) जाहिर लिलावाचे ठिकाणी धुम्रपान करणेस तंबाखू व तंबाखू जन्य पदार्थाचे सेवन करणेस सक्त मनाई आहे अन्यथा नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच सदरील ठिकाणचे कोणतेही नुकसान झाल्यास संबंधितास जबाबदार धरून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१४) **एकदा जाहीर केलेल्या साहित्याचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित अथवा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार लिलाव समितीस राहील**.

१५) कोणतीही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्विकारणे अगर नाकारणे या बाबतचे संपूर्ण अधिकार लिलाव समितीस राहतील.

१६) लिलावाचे ठिकाणी लिलाव समितीचा लिलावाच्या संदर्भात अंतिम निर्णय राहील.

१७) ज्या वाहनाचे रजिस्ट्रेशन व टॅक्स पुस्तक उपलब्ध असतील ती वाहने ताब्यात देताना देणेत येतील. ज्यांची सदर पुस्तके उपलब्ध नसतील त्या बाबत नाहरकत दाखला देणेत येईल.

१८) लिलावधारकाने वाहनाचा ताबा घेणे आगोदर व वाहन हस्तांतरण करते वेळी आर.टी.ओ. कार्यालयाकडून आवश्यक ते फॉर्म परिपुर्ण भरुन स्वाक्षरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

**स्वाक्षरीत/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

**<u>जाहिर लिलाव १४/०२/२०१८ वाहनांची यादी</u>**

| लॉट नं. | वाहन क्रमांक/ यंत्रसामग्री | कंपनी मेक | निर्मिती वर्ष | सध्यस्थितीतील वाहनाचे/ साहित्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | MH11-G-8029 | महिंद्रा जीप | २००१ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| २ | MH11-G-5088 | महिंद्रा जीप | १९९५ | पंचायत समिती, वडुज |
| ३ | MH11-G-6042 | महिंद्रा जीप | १९९७ | बांधकाम उपविभाग, कोरेगांव |
| ४ | MH11-AB-167 | ॲम्बेसॅडर कार | २००९ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ५ | MH11-AB-0021 | ॲम्बेसॅडर कार | २००४ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ६ | MH11-AB-0022 | ॲम्बेसॅडर कार | २००४ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ७ | MH11-AB-108 | ॲम्बेसॅडर कार | २००७ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ८ | MH11-AB-777 | ॲम्बेसॅडर कार | २००८ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ९ | MH11-AB-1010 | ॲम्बेसॅडर कार | २००८ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| १० | MH11-AB-7777 | ॲम्बेसॅडर कार | २००८ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| ११ | MH11-G-8091 | ॲम्बेसॅडर कार | २००४ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| १२ | MH11-AB-1111 | टाटा सफारी | २०११ | जि. प. वर्कशॉप, सातारा |
| १३ | MTL- 5007 | वॉटर टॅंकर | १९७३ | बांधकाम उपविभाग, फलटण |
| १४ | MHF- 6481 | वॉटर टॅंकर | १९७३ | बांधकाम उपविभाग, कोरेगांव |
| १५ | निरुपयोगी टायर्स (१०० नग) | निरुपयोगी टायर्स | | सातारा जि. प. गोडावून(खावली) |

**स्वाक्षरीत/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

## *नमुना*

## प्रतिज्ञापत्र(शपथपत्र)

**मा. कार्यकारी दंडाधिकारी सो. सातारा ता. जि. सातारा यांचे कोर्टात सविनय सादर**

मी वय- वर्षे, धंदा- राहणार-
आधारकार्ड नं.-

असे सत्यप्रतिज्ञेवरती लिहून देतो की,

मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून मी दि. १४/०२/२०१८ रोजी सातारा जिल्हा परिषद सातारा, बांधकाम विभाग (उत्तर) कडील वाहन क्र. हे जाहिर लिलावाव्दारे रक्कम रुपये /- (अक्षरी रक्कम- फक्त) किंमतीस विकत घेतले असून जुन्या वाहनांच्या खरेदीवर वस्तु व सेवा कर (जी. एस. टी.) नियमाप्रमाणे लागु असल्यास अथवा लागु झाल्यास मी भरण्यास तयार आहे. व त्याची सर्व जबाबदारी माझी राहील.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून यामध्ये काही चुक आढळून आल्यास मी भारतीय दंड विधान संहितेतील कलम २००, १९९, १९३(२) मधील तरतूदीनुसार होणा-या दंडास व शिक्षेस पात्र राहिन हे लिहून देत आहे.

**ठिकाण –**

**दिनांक-** **निविदाधारकाची सही**